नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०९/०२/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**१) पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील बाजार चौक दहेगाव जोशी येथे दिनांक ०८/०२/२०२२ चे १०.०० वा. दरम्यान एम.एच. —४०, बी.एम.— १६७५ क्रमांकाचा महीन्द्रा युव्हो ट्रॅक्टर व एम.एच. —४०, ए.एम.— २५५७ क्रमांकाची ट्रॉलीचा चालक आरोपी क्र. १) सिध्दिविनायक उर्फ सोनु वासुदेव कोल्हे, वय २२ वर्ष, रा. दहेगाव हा त्याचे इतर साथीदार मजुरांसोबत आरोपी क्र. २) आशीष लक्ष्मण सुरकार, वय २१ वर्ष, ३) महेश श्रावण बावणे, वय २१ वर्ष, ४) जय सुरेश उके, वय २१ वर्ष, ५) सेवक गोविंदा खंडाते, वय २६ वर्ष ६) सुनील अशोक बावणे, वय २२ वर्ष यांचे सोबत संगणमत करून आरोपी क्र. ७) मुकेश उर्फ प्रमोद मोरेश्वर बोरकर,(ट्रैक्टर मालक) सर्व रा. दहेगाव जोशी याच्या सांगण्यावरून कन्हान नदीच्या पात्रातुन त्यांच्या ताब्यातील वाहनात अवैधरित्या विना परवाना रेती उत्खनन करूण ट्रैक्टर ट्रॉली मध्ये भरून वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्यांचे कडुन ट्रॅक्टर ट्रॉली, रेती, फावडे व घमेले असा एकुण ८,५६,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस उपनिरीक्षक संदीपान उबाळे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संदीप कडु मो.क्र. ९८२३७२२४१८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. भिवापुर** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील नक्षीरोड भिवापुर येथे दिनांक ०८/०२/२०२२ चे ०२.०० वा. ते ०२.५५ वा. दरम्यान एम.एच.—४०/सी.डी— ५५९० क्रमांकाचा टिप्परचा चालक व अज्ञात मालक आरोपीतांनी त्यांच्या ताब्यातील वाहनात अवैधरित्या विना परवाना ८ ब्रास रेती किं. ४०,०००/—रू. चा माल भरून वाहतुक करीत असतांना पोलिसांना पाहून ते पळुन गेले. वाहनासह एकुण ४,०४,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक अनिल कोकोडे पो.स्टे. भिवापुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९ भादंवि. सहकलम १८४, १२२/१७७, २४(२)/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री शरद भस्मे मो.क्र. ९७६४९४६८०८ हे करीत आहे.

# जबरी चोरी

**पो.स्टे. केळवद**:— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील केळवद शिवार सावनेर छिंदवाडा माहामार्ग दि. ०८/०२/२०२२ चे १७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— दिलीपचंद केवळरामजी अगोले, वय ७० वर्ष, रा. वार्ड क्र ०४ बौद्धपूरा केळवद हे केळवद टोल नाका येथून पगार ९,०००/—रू. घेवून केळवद कडे घरी परत जात होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने टोल नाका ते आर टी ओ पॉईट येथे आरोपी क्र. १) विवेक मधूकर सूरजूसे खान वय ४४ वर्ष रा. सावता चौक वरूड, जि. अमरावती याने फिर्यादीची सायकल अडवून त्यांच्या पॅटच्या खिशात हात टाकून जबरी ने ९,०००/—रू. काढून हिसकावून चोरून नेत असतांना फिर्यादीने प्रतिकार केला असता ढकलढूकल करून केळवदचे पूढे पळून जाउन रोडच्या कडेला उभा असलेला त्याचा साथीदार आरोपी क्र ०२) भास्कर सदाशिव धोटे, वय २४ वर्ष, रा. केळवद वार्ड क्र. ०४ याचे मोटरसायकलवर बसून केळवद कडे पळून गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३९२, ३२३, ३४१, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुभाष राठोड मो.नं. ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**